# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 06 October 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०६ ऑक्टोबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना काही केल्या बंद होणार नाही, छत्रपती संभाजीनगर इथं महिला सशक्तीकरण मेळाव्यात मुख्यमंत्र्यांचा पुनरुच्चार
- ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ अभ्यासक डॉ.तारा भवाळकर यांची निवड
- मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर इथून पहिली रेल्वे अयोध्येकडे रवाना

आणि

- लातूर शहरातल्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातल्या वसतिगृहात राहणाऱ्या ६० विद्यार्थिनींना जेवणातून विषबाधा

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण ही योजना काही केल्या बंद होणार नाही, असा पुनरुच्चार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. छत्रपती संभाजीनगर इथं आज मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानाअंतर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सन्मान आणि राज्यस्तरीय विविध योजनांचा लोकार्पण सोहळा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत पार पडला, त्यावेळी ते बोलत होते.

> ***पहिल्या दिवसापासून आम्ही सांगितलं, ही योजना बंद होणार नाही हा विश्वास याठिकाणी व्यक्त करतो. कारण याची सर्व पैशाची तरतूद आम्ही केलेली आहे. हे काम निवडणुका असू द्या नसू द्या आम्हाला तुम्हाला पैसे द्यायचे होते, कारण तुमच्या संसाराला हातभार लावायचा होता.***

लाडकी बहिण योजनेचे नोव्हेंबर महिन्याचे पैसे देखील महिलांच्या खात्यात जमा झाले असून, महिलांना लखपती करण्याचं सरकारचं उद्दीष्ट असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. अडीच वर्षामध्ये महाविकास आघाडी सरकारने केलेली कामं, आणि पुढच्या दोन वर्षात महायुती सरकारने केलेली कामं एकदा तपासून बघावी, असं सांगून त्यांनी विरोधकांवर टीका केली. लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी चुकीचं नॅरटिव्ह पसरवलं, आता विधानसभा निवडणुकीत लाडक्या बहिणीच त्यांना उत्तर देतील, असं मुख्यमंत्री म्हणाले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे, खासदार भागवत कराड, पालकमंत्री अब्दुल सत्तार, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी यावेळी उपस्थित होते.

फडणवीस यांनी यावेळी बोलताना, शेतकऱ्यांसाठी दोन नवीन योजना आणल्याची माहिती दिली. राज्यातल्या शेतकऱ्याला पुढचे पाच वर्ष शेतीपंपाचं वीजेचं बिल माफ केलं असून, यापुढे हे बिल सरकार भरणार असल्याचं फडणवीस यांनी सांगितलं. तर सरसकट सगळ्या शेतकऱ्यांना केवळ दहा टक्के रक्कम भरुन सौर पंप देण्यात येणार असल्याचंही त्यांनी यावेळी जाहीर केलं.

रक्षाबंधनाच्या ओवाळणीनंतर आता बहिणींना भाऊबीजेची देखील ओवाळणी मिळणार असल्याचं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलं.

****

बुलडाणा जिल्ह्यात खामगांव इथं दोन हजार ३६५ कोटींच्या विकासकामांचा शुभारंभ आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. खामगाव तालुक्यातल्या पांदण रस्त्यांसाठी मार्चच्या बजेटमध्ये २५ कोटी देणार असल्याचं फडणवीस यांनी यावेळी जाहीर केलं. शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जाणारा जिगाव सिंचन प्रकल्प आणि वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पांमुळे खामगांवमधली गावं पाणीदार होणार असून, शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी येणार असल्याचं त्यांनी नमूद केलं. खामगांव इथल्या नवीन जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालयाच्या कोनशिलेचं अनावरणही फडणवीस यांच्या हस्ते झालं.

****

चालू आर्थिक वर्षासाठी सोयाबीन खरेदी केंद्र सुरु करण्यात आले असून, त्यांची संख्या आणखी वाढवणार असल्याचं राज्य सरकारच्या वतीने सांगण्यात आलं आहे. केंद्र शासनाने या आर्थिक वर्षासाठी सोयाबीन करिता प्रति क्विंटल चार हजार ८९२ रुपये इतका हमीभाव घोषित केला आहे. आतापर्यंत सुमारे पाच हजार शेतकर्यांनी सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी केली असून, जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचं आवाहन राज्य शासनानं केलं आहे.

****

दिल्लीत होणाऱ्या ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ अभ्यासक डॉ.तारा भवाळकर यांची निवड झाली आहे. साहित्य महामंडळाच्या आज पुण्यात झालेल्या बैठकीत भवाळकर यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. या बैठकीत संमेलनाच्या तारखा निश्चित करणं आणि कार्यक्रमांच्या रूपरेषेबाबतही चर्चा करण्यात आली.

लोकसाहित्याची स्त्रीवादी समीक्षा प्रस्थापित करण्यात डॉ. तारा भवाळकर यांची महत्वाची भूमिका राहिली आहे. ललित लेखन, अनुवाद, व्याख्याने, आकाशवाणीसाठी लेखन, यासह मराठी विश्वकोश, समाजविज्ञान कोश, मराठी वाङ्मयकोश, आणि ग्रंथकोश यातल्या अनेक महत्त्वाच्या नोंदी त्यांनी लिहिल्या आहेत.

साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करताना डॉ. तारा भवाळकर म्हणाल्या –

> ***अठ्ठ्याण्णवव्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी, ज्या निवड समितीने माझी निवड केलीय, त्यांच्याबद्दल मी सुरवातीला कृतज्ञता व्यक्त करते. हा सन्मान हा केवळ माझा नाहीये. मी ज्या अभ्यास क्षेत्रामध्ये काम करत आलेय, त्या लोकसंस्कृती आणि नाटक विशेषतः आणि स्त्री विचार या सर्व प्रकारच्या विचारांचा आणि साहित्याचा सन्मान आहे.***

****

मुंबईत मालाड इथं उभारण्यात आलेल्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण आज केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांच्या हस्ते झालं. यावेळी भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

****

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत आज छत्रपती संभाजीनगर इथून ८०० जेष्ठ नागरिकांना घेऊन जाणारी जिल्ह्यातली पहिली रेल्वे अयोध्येकडे रवाना झाली. पालकमंत्री अब्दुल सत्तार आणि गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर रेल्वे स्थानकावर या यात्रेकरुंना निरोप देण्यात आला. छत्रपती संभाजीनगरप्रमाणेच जालना जिल्ह्यात या योजनेसाठी ७९० अर्ज पात्र ठरले असून, त्याबाबतचं नियोजनही लवकरच करण्यात येईल, असं मंत्री सावे यांनी सांगितलं. छत्रपती संभाजीनगर विभागात जिल्हानिहाय तीर्थदर्शन योजनेचं नियोजन सुरू असून, जालना, नांदेड आणि बीड जिल्ह्यातूनही लवकरच प्रवासी रवाना होतील, अशी माहिती विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी यावेळी दिली.

****

लातूर शहरातल्या पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातल्या वसतिगृहात राहणाऱ्या ६० विद्यार्थिंनाना काल रात्री जेवणातून विषबाधा झाली. या विद्यार्थिनींना विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात उपचारासाठी दाखल केलं असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. अधिष्ठाता डॉ. उदय मोहित यांनी विद्यार्थिनींच्या प्रकृतीमध्ये वेगात सुधारणा होत असल्याचं आज सांगितलं. पोलिसांनी या प्रकरणाचा अधिक तपास सुरू केला असून, अन्नाचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहेत. खासदार डॉ. शिवाजी काळगे, जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर – घुगे यांनीही आज या विद्यार्थिनींची भेट घेतली.

****

धाराशिव जिल्ह्यात १५ ठिकाणी खरेदी केंद्र सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. या खरेदी केंद्रातून मूग,उडीद आणि सोयाबीनची खरेदी करण्यात येणार आहे.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत नांदेड जिल्ह्यातही खरीप हंगामातल्या पिकांच्या खरेदीसाठी एक ऑक्टोबर पासून ऑनलाईन नोंदणी सुरु झाली आहे. मूग, उडीद, सोयाबीन या पिकांचा यामध्ये समावेश असून खरेदीसाठी तेरा केंद्रं निश्चित करण्यात आली आहेत. दहा ऑक्टोबर पासून मूग, उडिद तर पंधरा ऑक्टोबर पासून सोयाबिनच्या प्रत्यक्ष खरेदीला सुरुवात होणार असून शेतकऱ्यांनी कागदपत्रे वेळेत जमा करावेत असं आवाहन जिल्हा पणन अधिकारी राजेश हेमके यांनी केलं आहे.

****

मुंबईत चेंबूर इथल्या आज पहाटे एका दुमजली इमारतीला लागलेल्या भीषण आगीत एकाच कुटुंबातल्या सात जणांचा होरपळून मृत्यू झाला. इमारतीच्या तळमजल्यावरील विजेच्या तारांजवळ शॉर्टसर्किट झाल्यानं ही आग लागल्याचं अग्निशमन अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं. या घटनेनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घटनास्थळी भेट देऊन, प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून घटनेची माहिती घेतली. मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रुपये शासनाकडून मदत केली जाईल, तसंच यामध्ये जखमी असणाऱ्या दोघांचा उपचाराचा खर्च शासन करेल, असं मुख्यमंत्र्यांनी जहीर केलं.

****

सोलापूर जिल्ह्यात पंढरपूर - फलटण मार्गावर कारुंडे इथल्या पुलावर टेम्पो आणि कारच्या अपघातात चार जण जागीच ठार झाले, तर तीन जण जखमी झाले. आज दुपारी हा अपघात झाला.

****

महिलांच्या टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज दुबई इथं भारत-पाकिस्तान सामना सुरु असून, भारतीय महिलांना सामना जिंकण्यासाठी ३८ धावांची आवश्यकता आहे. प्रथम फलंदाजी करत पाकिस्तानच्या संघाने २० षटकात आठ बाद १०५ धावा केल्या. भारताकडून अरुंधती रेड्डीनं तीन, श्रेयांका पाटीलनं दोन, तर रेणुका सिंग, दीप्ती शर्मा आणि आशा शोभना यांनी प्रत्येकी एक खेळाडू बाद केला.

दरम्यान, पुरुष क्रिकेटमध्ये आज भारत-बांग्लादेशदरम्यान तीन टी-ट्वेंटी सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना ग्वाल्हेर इथं खेळला जाणार आहे. संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

****

नागपूर इथं शहर पोलीस आयुक्त रविन्द्रकुमार सिंगल यांच्या संकल्पनेतून अंमली पदार्थांचं सेवन करणाऱ्या व्यक्ती वर प्रतिबंध व्हावा, वाहतुक नियमांचं पालन, सायबर सुरक्षा आणि महिला सुरक्षा, प्रदूषण कमी व्हावं याकरता जनजागृतीपर सायक्लोथॉन स्पर्धा घेण्यात आली. यावेळी पोलिस आयुक्त सिंघल यांनी उपस्थितांना महिलांच्या सुरक्षेसंबधी मार्गदर्शन केलं.

****